## मुदत संपल्यानंतरची नोंदणी (उशिरा होणारी नोंदणी, कलम १३)

**३.अ.९** अनेक वेळा जन्म आणि मृत्युची घटना तुम्हाला नोंदणीसाठी दिलेली २१ दिवसांची मुदत उलटून गेल्यानंतरही समजते. या पूर्वी म्हटल्याप्रमाणे अशा गोष्टी उशिरा होणारी नोंदणी (कलम १३) या सदरात येतात. उशिरा होणाऱ्या नोंदणीचा समावेश या कायद्यात पुढीलप्रमाणे करण्यात आला आहे.

- २१ दिवसानंतर पण घटना घडल्याच्या ३० दिवसांच्या आत (कलम १३ (१)).
- ३० दिवसांनंतर पण घटना घडल्याच्या १ वर्षाच्या आत (कलम १३ (२)).
- घटना घडल्याच्या १ वर्षानंतर (कलम १३ (३)).




जन्म–मृत्यु घटनेची नोंदणी २१ दिवसानंतर करावयाची झाल्यास विहीत ुल्क भरुन तसेच विहीत पध्दतीचा अवलंब करुन नोंदणी करता येते.

होय. नोंदणीसाठी ठरवून दिलेल्या २१ दिवसांच्या मुदतीनंतरही नोंदणी करण्याची तरतूद या कायद्याच्या कलम १३ मध्ये आहे. मात्र या संदर्भातील किचकट प्रक्रिया टाळण्यासाठी तुम्ही दिलेल्या मुदतीत नोंदणी करण्याचाच पाठपुरावा करायला हवा.

उशिरा नोंदणी केल्यास विलंबाबद्दल शुल्क आकारले जाते आणि त्या नोंदणीसाठी प्राधिकृत/विहीत अधिकाऱ्याची परवानगी लागते. अशी घटना अधिनियमाच्या (कलम १३, नियम ९ (१) ते ९ (३) अन्वये नोंदविता येते.

- जन्म आणि मृत्युच्या नोंदणीसाठी दिलेली २१ दिवसांची मुदत उलटून गेल्यावर पण ३० दिवसांच्या आत नोंदणी केल्यास विलंब शुल्क २ रुपये आकारले जाते. (नियम ९ (१))
- जन्म आणि मृत्युच्या घटनेनंतर ३० दिवसांनी पण १ वर्षाच्या आत नेमून दिलेल्या अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीने नोंदणी करता येते. त्यासाठी संबंधीताने नोटरीसमोर अथवा एखाद्या नेमलेल्या तत्सम अधिकाऱ्यासमोर प्रतिज्ञापत्र करून त्याची प्रत संबंधीत नोंदणी अधिकाऱ्यास देणे बंधनकारक आहे. अशी नोंदणी करण्यासाठी ५ रुपये विलंब शुल्क आकारले जाते. (नियम ९ (२))
- जन्म आणि मृत्युची घटना घडल्यानंतर १ वर्षानी नोंदणी करावयाची असेल तर वर्ग १ कार्यकारी दंडाधिकारी अथवा तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी सर्व गोष्टींची पूर्ण तपासणी करून तसा आदेश दिल्यानंतर ती नोंदणी करता येईल. या नोंदणीसाठी १० रुपये विलंब शुल्क आकारले जाईल. (नियम ९ (३))

उशिरा होणाऱ्या नोंदणीची प्रक्रिया पुढीलप्रमाणे थोडक्यात सांगता येईल.

## जन्म आणि मृत्युची उशिरा होणारी नोंदणी

| नोंदणीसाठी होणारा उशीर | | |
|---|---|---|
| २१ दिवसानंतर पण ३० दिवसांच्या आत (कलम–१३ (१)) | ३० दिवसानंतर परंतु १ वर्षाच्या आत (कलम १३ (२)) | १ वर्षानंतर (कलम १३ (३)) |
| विलंब शुल्क रु.२ | विलंब शुल्क रु.५ | विलंब शुल्क रु.१० |
| **परवानगी देणारे अधिकारी** | | |
| निबंधक/उपनिबंधक | विनिर्दिष्ट अधिकारी | कार्यकारी दंडाधिकारी |
| **प्रक्रिया** | | |
| माहिती देणाऱ्याने ठरवून दिलेली फी भरल्यानंतर | संबंधीत अधिकाऱ्यांनी लेखी परवानगी दिल्यानंतर आणि नोटरी किंवा राज्य शासनाने नेमलेल्या अधिकाऱ्यासमोर प्रतिज्ञापत्र लिहून दिल्यानंतर विलंब शुल्क भरून अशी नोंदणी करता येईल. | जन्माची किंवा मृत्युची नोंद घटना घडल्यानंतर १ वर्षाच्या आत न केल्यास कार्यकारी दंडाधिकारी यांनी सर्व कागदपत्रांची तपासणी करून दिलेल्या आदेशानंतर ठरवून दिलेले विलंबशुल्क भरल्यानंतर अशी नोंदणी करण्यात येईल. |

जन्म–मृत्युच्या नोंदणीला सर्वसाधारणपणे कोणत्या संभाव्य कारणामुळे उशीर होतो याची कल्पना आकृती ६ मध्ये दिली आहे.

**आकृती ६ नोंदणी उशीरा होण्यासाठी कारणीभूत घटक**




जन्म–मृत्यु घटनेची उशिराने नोंदणी करण्यापुर्वी ती या पुर्वी कधी नोंदविली गेली नाही याची खात्री करा.

जन्म आणि मृत्युची घटना घडल्यानंतर १ वर्षानंतर नोंदविताना ती या पूर्वी कधी नोंदवली गेलेली नाही याची तुम्ही खात्री करून घेणे आवश्यक आहे. या संदर्भातील पुर्ननोंदणी टाळण्यासाठी काही राज्यांनी नोंदणी रजिस्टरमध्ये शोध घेण्याची एक विशिष्ट पद्धती तयार केली आहे. रजिस्टरमध्ये अशी नोंद सापडली नाही तर संबंधीतांना नोंदणी नसल्याचा अनुपलब्धता दाखला (नमुना १०) देण्यात येतो. ही पद्धती सर्व राज्ये आणि केंद्रशासीत प्रदेशात लागू होणे गरजेचे आहे. अर्थात तुम्ही ही बाब लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

- नोंदणी नसल्याबाबतचा अनुपलब्धता दाखला मोफत दिला जाणार नाही.
- माहिती देणाऱ्याने घटनेची माहिती ठराविक मुदतीत दिली आणि निबंधकाने ती नोंदवली नाही तर ती नोंद 'उशिराने होणारी नोंदणी' या सदरात येणार नाही. उदा.– संस्थांमध्ये होणाऱ्या जन्माच्या संदर्भात संस्थाचालकाकडून नोंदणी निबंधकाकडे माहिती पाठवली जाते. अशी माहिती नोंदवली गेली नाही किंवा त्याबाबतचा जन्मदाखला दिला गेला नाही, अशा परिस्थितीत त्या पालकांनी ७/८ महिन्यांनी जरी जन्मदाखला मागितला तरी त्यासाठी विलंब शुल्क आकारले जाणार नाही.

काही वेळा असे घडते की माहिती देणारी व्यक्ती जन्म, मृत्यु किंवा मृतजन्म या विषयीची तोंडी माहिती तुम्हाला देते. अशा स्थितीत तुम्ही नोंदणी फॉर्म स्वत: भरावा आणि त्यावर ती माहिती देणाऱ्याची स्वाक्षरी घ्यावी किंवा त्याच्या अंगठ्याचा ठसा घ्यावा. (कलम ११)

**शंका आणि समाधान :**

| क्रमांक | शंका | समाधान |
|---|---|---|
| १ | जन्म–मृत्यु नोंदणीचा कायदा १९६९ लागू होण्यापूर्वीची जन्म–मृत्युची घटना नोंदविता येते का? | जन्म–मृत्यु नोंदणीचा कायदा १९६९ लागू होण्यापूर्वीची जन्म–मृत्युची घटना या कायद्यातील तरतुदीनुसार नोंदवता येते. ती घटना या कायद्याच्या कलम १३ अन्वये नोंदवता येते. |
| २ | कलम १३ १) आणि १३ (२) एखादी घटना नोंदविण्यास निबंधका. कडून उशीर झाला तर त्याबाबतचे विलंब शुल्क निबंधकाकडून घेतले जाईल का? | कलम १३मध्ये संबंधीत व्यक्तीला द्याव्या लागणाऱ्या विलंब शुल्काचाच फक्त उल्लेख आहे. त्यात निबंधकाकडून उशीर झाल्यास त्याच्याकडून विलंब शुल्क घेण्याबाबत कोणताही निर्देश नाही. मात्र कलम २३ (२) अन्वये कोणतेही संयुक्तीक कारण न देता नोंदणीस नकार दिल्याबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल त्यांच्याकडून दंड आकारता येतो. |

## दृष्टीक्षेपात जन्म आणि मृत्युची नोंदणी

पुढील चित्रात जन्म आणि मृत्युच्या नोंदणीची संपूर्ण प्रक्रिया दाखविण्यात आली आहे. त्यात घटना कुठे घडली (घर, संस्था, सार्वजनिक स्थळ, किंवा जंगल), माहिती देणारा (कुटुंब प्रमुख, संस्थाचालक, विभागाचा प्रमुख आणि नोंदणीसाठी दिलेली मुदत (२१ दिवस, २१ ते ३० दिवस, १ वर्षापर्यंत आणि १ वर्षानंतर) यांचा समावेश आहे.

## आकृती ७ जन्म–मृत्युच्या नोंदणीच्या पद्धतीची एकत्रित माहिती

